केंद्र शासन पुरस्कृत **जलमणी कार्यक्रमांतर्गत** ग्रामीण शाळांमध्ये जलशुध्दीकरण संयंत्रे बसविण्यासाठीची निविदा व संनियंत्रण कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.२३७/पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २९ जानेवारी, २०११.

वाचा :- १) शासन निर्णय क्र. डब्ल्युक्युएम २००८/प्र.क्र.०६८/पापु-१२,दि.०३ नोव्हेंबर,२००८.
२) शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.१९६/पापु-०७, दि. १ ऑक्टोबर, २०१०.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, ग्रामीण शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र शासनाने सन २००८ मध्ये जलमणी कार्यक्रम बालकदिनी घोषित केला आहे. त्यानुसार, ग्रामीण शाळांमध्ये जलशुद्धीकरण सयंत्रे बसविण्याची प्रक्रिया राज्यात सुरु आहे.

२. संदर्भ क्र.२ अन्वये, जलमणी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा कार्यक्रम पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संयुक्त सहकार्याने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याअनुषंगाने कार्यपद्धती विहित करण्यात आली होती. जलमणी कार्यक्रम परिणामकारकपणे राबविण्यासाठी जिल्हा आणि विभागीय पातळीवर शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्यांमध्ये समन्वय व नियोजन झाल्यास कार्यक्रमाला अधिक गती येण्यास मदत होईल. जलमणी कार्यक्रम केंद्र शासनाचा कालबद्ध कार्यक्रम असल्यामुळे तो विहित मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे

३. या सर्व बाबींचा विचार करून,जलमणी कार्यक्रमाचे पुढील उर्वरित उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी या कार्यक्रमाचे विकेंद्रीकरण करून हा कार्यक्रम विभागीय पातळीवरून, विभागीय आयुक्तांच्या संपूर्ण मार्गदर्शन, संनियंत्रणाखाली, अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष, यांचेमार्फत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जलमणी कार्यक्रमाचे पुढील उर्वरित उद्दीष्ट साध्य करण्यासाठी या कार्यक्रमाचे विकेंद्रीकरण करून हा कार्यक्रम विभागीय पातळीवरून, विभागीय आयुक्तांच्या संपूर्ण मार्गदर्शन, संनियंत्रणाखाली राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

२. जलशुद्धीकरण संयंत्रांच्या खरेदीची निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. विभागीय आयुक्त, प्रादेशिक महसूल विभाग | अध्यक्ष |
| २. उप आयुक्त, विकास, प्रादेशिक महसूल विभाग | सदस्य |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (विभागीय आयुक्त यांचे निवडीनुसार किमान १) | सदस्य |
| ४. विभागीय शिक्षण उप संचालक, (संबंधित जिल्हे) | सदस्य |
| ५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ६. विभागीय उद्योग सहसंचालक | सदस्य |
| ७. लेखा अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ६.अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष | सदस्य सचिव |

३. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्तांनी अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबवावी. निविदा प्रक्रिया राबविण्यासाठीची निविदाविषयक प्रारुप कागदपत्रे अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष यांच्या email id वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

४. उपरोक्त समितीने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पुढील वेळापत्रकानुसार पार पाडावी :

| | | |
|---|---|---|
| अ) निविदा सूचना प्रसिद्ध करणे | दि. ०७ फेब्रुवारी, २०११ | पर्यंत |
| ब) निविदा पुर्व बैठक बोलविणे | दि. २७ फेब्रुवारी, २०११ | रोजी |
| क) निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व कार्यादेश देणे | दि. ११ मार्च, २०११ | पर्यंत |
| ड) सर्व सयंत्रांची उभारणी करणे | दि. २६ एप्रिल, २०११ | पर्यंत |

५. निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी किमान २ दिवस आधी संभाव्य निविदाकारांची निविदा-पुर्व बैठक संबंधित विभागीय आयुक्तांनी आयोजित करावी. या बैठकीमध्ये निविदाकारांना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची संपूर्ण माहिती देऊन त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकाचे समाधान करावे.

६. जलमणी कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्यासाठी, आर्थिक वर्ष १०-११ साठीचे उर्वरित जिल्हा निहाय, विभाग निहाय उद्दीष्ट परिशिष्ट- अ मध्ये पहावे.

७. जलमणी कार्यक्रमांतर्गत बसवावयाच्या जलशुध्दीकरण संयंत्रांची प्रस्तावीत कामे पुढीलप्रमाणे आहेत :

i) संपूर्ण युनीट, अशुद्ध पाणी सयंत्रामध्ये न्यावयासाठीचा आवश्यक क्षमतेचा पंप

ii) इलेक्ट्रीक केबल्स, कन्ट्रोल व्हाल्व्ह, ५ मी.मी.लांबीपर्यंतची पाईपलाईन, उभारणी, सिव्हील कामे, वेस्ट वॉटर डीस्पोजल व्यवस्था,

iii) पुढील पाच वर्षापर्यंत सयंत्रांची संपुर्ण देखभाल व दुरुस्ती आवश्यक त्या साहित्याच्या / रसायनांच्या / मेंब्रेनच्या बदलण्यासहीत करणे,

८. सदर शासन निर्णयान्वये केलेल्या दुरुस्त्यांसह जिल्हा स्तरावर जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकानुसार होत आहे, याची खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावरून करण्यात येईल.

९. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांची राहील. त्यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या योग्य त्यासमन्वयाने प्रगतीचे सनियंत्रण करावे. संबंधित शिक्षणाधिकारी यांनी दर १५ दिवसांनी आढावा घेऊन सर्व शाळांमध्ये जलशुद्धिकरण संयंत्रे बसविण्यात आल्याची खात्री करावी व तसा अहवाल सादर करावा.कार्यकारी अभियंत्यांनी या अहवालाच्या आधारे उप अभियंत्यांमार्फत १०० टक्के शाळांमध्ये व स्वत: कोणत्याही किमान ५ टक्के शाळांची तपासणी करुन जलशुद्धिकरण संयंत्रे सुरळित चालू असल्याची खात्री करावी व कार्यक्रमाच्या प्रगतीची माहीती दर १५ दिवसांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांना सादर करावी.कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी पुरवठादारांची देयके पारित करावी व तसा अहवाल विभागीय आयुक्तांना सादर करावा.

१०. विभागीय आयुक्तांनी या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी झालेल्या /होत असलेल्या प्रगतीची दर १५ दिवसांनी आढावा घ्यावा.

११. जलमणी कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारा निधी संबंधित जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात येईल.त्यासाठी जिल्हा परिषदांनी जलमणी कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त बचत खाते उघडावे.खाते उघडल्यानंतर त्याचा संपूर्ण तपशिल कार्यकारी अभियंत्यांनी वित्तिय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,नवी मंबई यांना उपलब्ध करुन द्यावा. वित्तिय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासन आदेशानुसार संबंधित जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करुन द्यावा

१२. जलमणी कार्यक्रमाची माहिती online भरण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंत्यांची राहील.माहिती online भरल्यानंतरच पुरवठादारांची देयके पारित करावीत.

१३.  या कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चाची उपयोगिता प्रमाण पत्रे सादर करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांची राहील.त्यांनी खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष यांना सादर करावीत. अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेली उपयोगीता प्रमाणपत्रे राज्यस्तरीय भारत निर्माण कक्षास सादर करावीत.राज्यस्तरिय भारत निर्माण कक्षाने एकत्रीत उपयोगीता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.राज्यस्तरावरुन या कार्यक्रमाच्या संनियंत्रणाची जबाबदारी मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई यांची राहिल.

१४.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट www.maharashtra.gov.in वर टाकण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०११०१२११८३५०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,
२) मा.राज्यमंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) संचालक, शालेय शिक्षण पुणे.
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८) विभागीय उद्योग संचालक, उद्योग संचालनाय (सर्व विभाग)
९) प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई.
११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नवी मुंबई
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे, कोल्हापूर, मुंबई, नाशिक,औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर
१४) अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष, (सर्व)
१५) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१६) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ठाणे, नाशिक, नंदूरबार, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यातील)
१७) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
२०) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
२२) लेखा शाखा, (सु.स.प्र.व्य.कक्ष), नवी मुंबई
२३) निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

# परिशिष्ट अ

(शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.२३७/पापु-०७, दि.२१ जानेवारी,२०११ चे सहपत्र)

## केंद्र पुरस्कृत जलमणी कार्यक्रम

आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये बसवावयाच्या जल शुध्दीकरण संयंत्रांचा जिल्हा निहाय तपशील

| अ.क्र. | जिल्हा | आर्थिक वर्ष २०१०-११ चे एकूण उद्दिष्ट | पूर्ण केलेले उद्दिष्ट | उर्वरित उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १७७ | ५८ | ११९ |
| २ | रायगड | ३७७ | १३० | २४७ |
| ३ | रत्नागिरी | ३१५ | ६२ | २५३ |
| ४ | सिंधुदुर्ग | १२७ | ४३ | ८४ |
| **कोकण विभाग** | | **९९६** | **२९३** | **७०३** |
| ५ | नाशिक | ३४७ | १९१ | १५६ |
| ६ | जळगाव | ४१२ | १६८ | २४४ |
| ७ | अहमदनगर | २३० | १९७ | ३३ |
| ८ | धुळे | १७४ | २९ | १४५ |
| ९ | नंदुरबार | ९१ | ८ | ८३ |
| **नाशिक विभाग** | | **१२५४** | **५९३** | **६६१** |
| १० | पुणे | १२० | ९७ | २३ |
| ११ | सोलापूर | २४१ | ८६ | १५५ |
| १२ | सातारा | ३९५ | ७८ | ३१७ |
| १३ | कोल्हापूर | ४३० | १७६ | २५४ |
| १४ | सांगली | २७५ | ५३ | २२२ |
| **पुणे विभाग** | | **१४६१** | **४९०** | **९७१** |
| १५ | औरंगाबाद | २८५ | ५९ | २२६ |
| १६ | परभणी | १०८ | ३० | ७८ |
| १७ | बीड | ३०३ | १११ | १९२ |
| १८ | उस्मानाबाद | ९८ | ३८ | ६० |
| १९ | लातूर | ४७ | १५ | ३२ |
| २० | हिंगोली | १४० | ३७ | १०३ |
| २१ | जालना | १९४ | ४० | १५४ |
| २२ | नांदेड | २७२ | ९० | १८२ |
| **औरंगाबाद विभाग** | | **१४४७** | **४२०** | **१०२७** |
| २३ | अमरावती | १८७ | ७० | ११७ |
| २४ | यवतमाळ | ३७२ | ७० | ३०२ |
| २५ | अकोला | १४५ | ४९ | ९६ |
| २६ | वाशिम | ८४ | ३१ | ५३ |
| २७ | बुलढाणा | २०५ | ५१ | १५४ |
| **अमरावती विभाग** | | **९९३** | **२७१** | **७२२** |
| २८ | नागपूर | १८६ | ६१ | १२५ |
| २९ | वर्धा | २५२ | ३६ | २१६ |
| ३० | भंडारा | १५९ | १२३ | ३६ |
| ३१ | गोंदिया | १५९ | ५४ | १०५ |
| ३२ | गडचिरोली | ४५५ | ४० | ४१५ |
| ३३ | चंद्रपूर | १३५ | २६ | १०९ |
| **नागपूर विभाग** | | **१३४६** | **३४०** | **१००६** |
| **एकूण** | | **७४९७** | **२४०७** | **५०९०** |